# रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)

मुख्यकचेरी : प्लॉट क्र.बीसी/१, गेट नं.५ च्या शेजारी, पेट्रोलपंपाच्या मागे, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११०३७

☎ ०२०-२४२७०१४८/२४२७०५४८ www.rupeebank.com ✉ admin@rupeebank.com

दिनांक : २९.१२.२०२५

## :: जाहीर सूचना ::

**:: स्वमालकीच्या ऑटोरिक्षासहीत पूर्णवेळ सेवा देऊ इच्छिणाऱ्या अनुभवी, निर्व्यसनी रिक्षाचालकांकडून अर्ज मागविणेबाबत ::**

स्वमालकीच्या ऑटोरिक्षा असलेल्या व रिक्षा वाहनपरवाना असलेल्या अनुभवी, निर्व्यसनी रिक्षाचालकाची बँकेस आवश्यकता आहे. संबंधित उमेदवार यांने बँकेस त्याची रिक्षा त्याच्या सेवेसह बँकेस पूर्णवेळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

संबंधित रिक्षा सुस्थितीत व राज्य शासनाच्या परिवहन विभागाच्या अटी व निकषांनुसार असणे आवश्यक आहे. संबंधित रिक्षाकरिता होणारी देखभाल, दुरुस्ती, लागणारे इंधन इ. खर्च रिक्षाचालकाने स्वतः करावयाचा आहे. त्याबाबत बँकेची कोणतीही जबाबदारी/दायीत्व राहणार नाही. तसेच बँकेस सदरची सेवा देताना रिक्षास अपघात झाल्यास व संबंधित वाहन व/ वाहनचालक यांना कोणत्याही प्रकारची हानी/इजा पोहोचल्यास त्याबाबत नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी बँकेवर रहाणार नाही. संबंधित वाहनाचे रिक्षामालकाने अद्ययावत विमा नुतनीकरण स्वखर्चाने करणे आवश्यक आहे.

सदर रिक्षा बँकेस सेवेसह उपलब्ध करुन देणे यासाठी संबंधित उमेदवारास दैनंदिन निश्चित केलेल्या दराने त्या-त्या आठवडयाचे चार्जेस दर आठवडयाच्या अखेरीस अदा करण्यात येईल. तथापि कामकाजाच्या वेळेव्यतिरिक्त अधिक वेळ सेवा उपलब्ध द्यावी लागल्यास त्यास बँकेतील अन्य रिक्षाचालकाप्रमाणे प्रति तास विशेष भत्ता दराने खर्च अदा करण्यात येईल. परंतु कोणत्याही कारणास्तव तो बँकेचा सेवक असणार नाही आणि अन्य सेवकांप्रमाणे कोणताही पगार, रजा, सोयी-सवलती मिळणार नाही. सेवा पुरवठादार या नात्याने त्याची सेवा राहील.

तरी इच्छुक रिक्षाचालकांनी त्यांचे स्वाक्षरीत अर्ज (नाव, पत्ता, वय, मोबाईल नंबर, बॅच नंबर, लायसेन्स नंबर, उपलब्ध करणाऱ्या रिक्षेबाबतची सर्व कागदपत्रे उदा. पीयुसी, इन्शुरन्स पॉलिसी, आरसीटीसी, तसेच कामकाजाचा अनुभव इ. तपशिलासह) समक्ष अथवा पोस्टाद्वारे बँकेच्या मुख्यकचेरी कार्यालयाच्या वरील पत्त्यावर अथवा admin@rupeebank.com या ईमेलवर दि.०७.०१.२०२६ पर्यंत सादर करावेत. सदर अर्जामध्ये दैनंदिन चार्जेसबाबत आपली अपेक्षा स्पष्टपणे नमूद करावी. आलेल्या अर्जांमधून योग्य उमेदवाराची निवड करणे व त्यासाठी दैनंदिन चार्जेस ठरविणे याबाबतचा अधिकार बँकेचे मा.अवसायक यांना राहील व तो अंतिम असेल.

रुपी बँकेत यापूर्वी रिक्षाचालक पदावर समाधानकारकरित्या काम केलेल्या व स्वतःची रिक्षा असलेल्या माजी कर्मचाऱ्यास याबाबत प्राधान्य राहील.

**व्यवस्थापक (प्रशासन)**
रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)

**सरव्यवस्थापक**
रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)